सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधीत बीड जिल्हयातील कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः विपआ-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-४अ

मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, मुंबई - ४००००१
तारीख: ४ जून, २०१९

प्रस्तावना -

सन २०१५ च्या दुसऱ्या अधिवेशनात “बीड जिल्हयातील रुग्णालयात रुग्णांची होत असलेली हेळसांड” याबाबत सर्वश्री अमरसिंह पंडीत व इतर मा.विधान परिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र. १२५ वरील दि.२१.७.२०१५ रोजी विधिमंडळात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने “प्रधान सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून बीडच्या संपूर्ण कारभाराची चौकशी करून याबाबत निर्णय घेण्यात येईल. दोषी असतील त्यांना कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, कोणीही राजकीय हस्तक्षेप करू शकणार नाही असे मी सभागृहात आश्वासित करतो, निपक्ष:पातीपणे चौकशी करून याचा अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहात सादर करण्यात येईल, अपंगांना चूकीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये यासाठी आताचे सॉप्टवेअर बदलावयाचे झाल्यास त्यासाठीही तयारी असल्याचे तत्कालीन मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांनी विधिमंडळास आश्वासित केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधीत बीड जिल्हयातील कारभाराची चौकशी व सदर आश्वासनाच्या पूर्ततेसाठी एक त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तदनुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधीत बीड जिल्हयातील कारभाराची चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव (सा.आ. व कु.क) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान (सदस्य) आणि सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर) (सदस्य सचिव) यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येत आहे.

उपरोक्त समिती सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधीत बीड जिल्हयातील कारभाराची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०४१३१४३७१११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Harishchandra Dhabade

Digitally signed by Kiran Harishchandra Dhabade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=63d2135cee8a94b4f96222ed054d19f05ae9a39d43616d1b9a54dfbe721bce71, cn=Kiran Harishchandra Dhabade
Date: 2019.06.04 17:38:31 +05'30'

(किरण धबडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा .
६. उप संचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, बीड.
८. जिल्हा आरोग्य अधिकारी,बीड.
९. निवड नस्ती.